सं. फौ. ख. क्र.८७५/२०२१ निशाणी ३५

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – शालीनी महेंद्र महाद्वारे

वय – ३२ वर्षे, व्यवसाय – म.पो.कॉ. पोलीस स्टेशन, उरळ

पत्ता – रा. कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. मी पोलीस स्टेशन, उरळ येथे सन २०२० ते आजपर्यंत म.पो.कॉ. म्हणून कार्यरत आहे. दि.१९.१०.२०२० रोजी मी पो.स्टे. येथे कार्यरत असताना एएसआय राजाभाऊ बचे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, लोहारा येथे एक इसम अवैधरित्या त्याच्या घरासमोरील अंगणामध्ये मद्यविक्री करीत आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने मी, एएसआय राजाभाऊ बचे, पो.कॉ. गजानन ठोंबरे तसेच सोबत दोन पंच यांना घेवून शासकीय वाहनाने मिळालेल्या बातमीची शहानिशा करण्याकरीता ग्राम लोहारा येथे गेलो.

२. आरोपी राजू मालटे याच्या घराजवळ गेलो असता त्याच्या जवळ देशी दारु सखु संत्रा व टॅंगो कंपनीच्या मद्याच्या ९० मिलीच्या एकुण २५ नग मिळून आले. राजू मालटे यास आम्ही आमची ओळख करुन दिली. त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने राजू मालटे सांगितले. त्याच्याकडे मद्यविक्रीचा परवाना आहे अथवा कसे याबाबत विचारणा केली असता त्याने त्याच्याकडे परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्याच्याजवळ मिळून आलेला देशी दारुच्या ९० मिलीच्या २५ बाटल्या दोन पंचांसमक्ष जप्त करुन ताब्यात घेतल्या. तसेच सदर मुद्देमालातून एक बाटली रासायनिक पृथ्थकरणाकरीता नमुना म्हणून काढून घेतली. तसेच सदर घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. त्यानंतर आरोपी मुद्देमालासह पो.स्टे. येथे आणला. तसेच राजाभाऊ बचे यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात उपस्थित नाहीत, त्याच्या ओळखीविषयी त्यांच्या वकीलांमार्फत कोणताही वाद उपस्थीत नसल्याचे सांगितले.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती व्ही. एच. शेगोकार यांच्या मार्फत उलटतपासः**

३. आम्ही लोहारा येथे ज्या वाहनाने गेलो त्या वाहनाची नोंद लॉगबुकला केली अथवा नाही, याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पंचांना पो.स्टे. येथे बोलावून दोन्ही पंचनामे तयार केले व त्यावर त्यांच्या सह्या घेतल्या. सदर छाप्या दरम्यान आरोपीकडून सखु संत्रा व टॅगोच्या किती बाटल्या मिळून आल्या त्याचा तपशिल मला सांगता येणार नाही. जप्त मुद्देमालातून रासायनिक विश्लेषणाकरीता नमुना बाटली ही सखु संत्राची काढली होती. हे म्हणणे खरे नाही की, लोहारा या गावी दारु विक्रीचा अवैध व्यवसाय बरेच लोक करतात. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २९.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.29 13:01:11 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | २९/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | २९/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | २९/०१/२०२६ |